'दूरस्थ मतदान पध्दती आणि भारताची त्या दिशेने वाटचाल: एक चिकित्सक अभ्यास'

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या
संकल्पित प्रबंधाची रूपरेषा

संशोधक

वाघमारे संध्याताई मारोतीराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ.माधव माणिकराव चोले

प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक राज्यशास्त्र विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर

संशोधन केंद्र

देगलूर महाविद्यालय, देगलूर

प्रस्तावना

भारतीय निवडणूक पध्दती आणि प्रक्रिया हे भारतीय लोकशाहीचा एक महत्वाचा घटक आहे. त्यामुळे भारतीय निवडणूक पध्दती आणि प्रक्रिया यांचा अभ्यास करणे महत्वपूर्ण ठरते. भारतात निवडणूक प्रक्रिया संवैधानिक तरतुदी नुसार चालवले जातात. स्वतंत्र निवडणूक आयोग हा निवडणूकांच्या आयोजनासाठी पारदर्शकता व न्याय सुनिश्चित करण्यासाठी कार्यरत आहे. निवडणूक आयोग स्वतंत्र आणि निपःक्ष निवडणूक प्रक्रियेची हमी देतो. आदर्श आचारसंहीता मतदार यादींची पारदर्शकता मतदान केंद्राची सुरक्षा व ई.व्ही.एम. चा वापर इत्यादींची देखरेख करतो. भारतीय निवडणूक पध्दती ही जगातील सर्वात मोठी लोकशाही प्रक्रिया असून ती विविधतेत एकता, पारदर्शकतेचा आदर्श मानली जाते.

भारतात लोकसभा निवडणूका प्रत्येक पाच वर्षाने होतात, यात देशभरातून निवडून आलेले प्रतिनिधी लोकसभेत जातात. लोकसभा सदस्यांची निवड बहुमत पध्दतीने होते तसेच राज्यसभेचे सदस्य विविध राज्यांच्या विधानसभाद्वारे निवडले जातात. त्यांचा कालावधी सहा वर्षांचा असतो व एक तृतीअंश सदस्यांचा कार्यकाळ प्रत्येक दोन वर्षाने समाप्त होतो. प्रत्येक राज्यात विधानसभा निवडणूका होतात. लोकसभेप्रमाणेच विधानसभेचे सदस्य बहुमत पध्दतीने निवडले जातात. ग्रामीण आणि नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूका होतात, यामध्ये सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महानगरपालीका सदस्य इत्यादींची निवड होते.

दूरस्थ मतदान पध्दती आणि भारता संबंधी अलीकडील प्रस्ताव

निवडणूक आयोग (E.C.) स्थलांतरीत मतदारांसाठी रिमोट मतदार यंत्र सुरु करण्याच्या योजनेवर काम करीत आहेत. यामुळे स्थलांतरीत मतदारांना रिमोट इलेक्ट्रॉनिंग व्होटींग मशिन किंवा आर.व्ही.एम. द्वारे रिमोट ठिकाणाहुन मतदान करता येईल, मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्यांना त्यांच्या मुळ जिल्हयात जावे लागणार नाही. देशांतर्गत स्थलांतरासाठी कोणताही केंद्रीय डेटाबेस उपलब्ध नसला तरी, सार्वजनिक डोमेनमधिल उपलब्ध डेटाचे विश्लेषण, काम, विवाह आणि शिक्षण संबंधी हे देशांतर्गत स्थलांतराचे महत्वाचे घटक म्हणून सुचित करते. एकूणच देशांतर्गत स्थलांतरामध्ये ग्रामीण लोकसंख्येमध्ये 'बाहेरचे स्थलांतरन' प्रामुख्याने आहे आणि अंतर्गत स्थलांतर सुमारे ८५ टक्के राज्यांमध्ये आहे. दूरस्थ मतदानासाठी स्वतंत्र मतदान केंद्र स्थापन केले जाणार आहेत. निवडणूक आयोगाच्या मते, प्रत्येक एकच दूरस्थ मतदान केंद्र ७२ मतदान संघांना कव्हर करेल. निवडणूक आयोग स्थलांतरीत मतदारांसाठी रिमोट मतदान यंत्र सुरु करण्याच्या योजनेवर काम करीत आहे.

दूरस्थपणे मतदान करण्यासाठी मतदाराला मतदानाच्या दिवसापुरते दूरस्थ मतदान संधीसाठी ऑनलाईन किंवा ऑफलाईन नोंदणी करावी लागेल. हे त्यांच्या घरच्या मतदान संघातील संबंधीत रिटर्निंग ऑफिसरला पुर्व सुचना दिलेल्या वेळेत करावे लागेल.

एकदा मतदाराची पडताळणी झाल्यानंतर दूरस्थपणे त्याचे मत देण्यासाठी पात्र घोषीत झाल्यानंतर ते सध्या राहत असलेल्या परीसरात एक बहु-घटकीय रिमोट मतदान केंद्र स्थापन केले जाईल. आर.व्ही.एम. मध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रा प्रमाणेच सुरक्षा व्यवस्था आणि मतदानाचा अनुभव असेल. या आर.व्ही.एम. मध्ये निश्चितच वॅलेट पेपर शीटऐवजी उमेदवार आणि चिन्हांसह भिन्न इलेक्ट्रॉनिक मतपत्र प्रदर्शन प्रणाली असेल. आर.व्ही.एम. मध्ये वेगळी इलेक्ट्रॉनिक बॅलेट डिस्प्ले सिस्टीम असेल, जेव्हा मतदार मतदान केंद्रावर पिठासीन अधिकाऱ्याच्या उपस्थित त्याचे किंवा तिच्या मतदार संघाचे कार्ड स्कॅन करतो, तेव्हा त्यांच्या संबंधित मतदारसंघ आणि उमेदवारांची यादी आर.व्ही.एम.डिस्प्लेवर दिसून येईल. मतांच्या मोजणीसाठी इलेक्ट्रूनिक प्रणाली देखिल प्रत्येक उमेदवारांच्या मतांची गणना आणि संग्रहीत करेल.

<u>रिमोट इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (आर.व्ही.एम.)</u>

रिमोट ई-वोटिंग मशिन हे एक स्वतंत्र उपकरण असेल ज्याला ऑपरेट करण्यासाठी कनेक्टीव्हीटीची आवश्यकता नाही. हे मशिन सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इलेक्ट्रॉनिक्स, कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने विकसित केले आहे. हे यंत्र एका दूरस्थ मतदान केंद्रावरून ७२ मतदारसंघ हाताळू शकते. ECIN आणि भारत इलेक्ट्रॉनिक हे दोन PSU EVM चे उत्नादन करतात. RVM ही M3 (मार्क ३) ई.व्ही.एम. ची सुधारीत आवृत्ती आहे. आर.व्ही.एम. मध्ये खालील घटकांचा समावेश होतोः

आर.सी.यू. (रिमोट कंट्रोल यूनिट) ज्यामध्ये सध्या सी.यू. प्रमाणेच नियंत्रणे आहेत. आर.सी.यू. उमेदवार आणि मतदार संघानुसार एकूण मतांचा निकाल देखिल संग्रहीत करू शकते. (आर.बी.यू) (रिमोट बॅलेट यूनिट) ज्यामध्ये निश्चित बॅलेट पेपरशीट ऐवजी इलेक्ट्रॉनिक डायनॉमिक डिस्प्ले (बी.यू.ओ.डी.) असते. जे मतदासंघ कार्ड रीडरने वाचलेल्या मतदारसंघ क्रमांकावर आधारे उमेदवारांची यादी गतीशीलपणे प्रदर्शित करू शकते. RVVPAT (रिमोट वोटर व्हेरिफाईड पेपर ऑडिट ट्रेल) ज्याची कार्यक्षमता सध्याच्या M3VVPAT सारखीच आहे. शिवाय ते उमेदवारांच्या प्रतिमेसह वेगवेगळया AC/PC चिन्ह संग्रहीत करू शकते. CCR (मतदारसंघ कार्ड रिडर, जो विशिष्ट मतदाराचा मतदारसंघ क्रमांक वाचण्यासाठी बारकोड रीडर आहे. PDCU युनिटशी जोडलेले आहे. PDCU (सार्वजनिक डिस्प्ले कंट्रोल युनिट) जे CCR, सार्वजनिक प्रदर्शन आणि RBU मधील इंटरफेस मधून कार्य करते. ते सूची सक्षम करते. तसेच विशिष्ट मतदारसंघाचे उमेदवार प्रदर्शित केले जाते.

सार्वजनिक प्रदर्शन आणि आर.बी.यू.एकाच वेळेस आणि आर.एस.एल.यू. (रिमोट सिम्बॉल लोडींग युनिट) जे होम आर.ओ. च्या नियंत्रणाखाली असलेल्या लॅपटॉप वरून रिमोर्ट एसी/पीसी उमेदवारांची चिन्हे कॅप्चर करण्यासाठी वापरले जाते. ही चिन्हे नंतर रिमोर्ट आर. ओ. च्या नियंत्रणाखाली RVVPAT (रिमोट व्होटर व्हेरिफाईड पेपर ऑडिट ट्रेल) मध्ये लोड केली जातील.

विरोधी पक्ष आणि तज्ज्ञांनी रिमोट मतदान सुविधा सुरू करण्याच्या निवडणूक आयोगाच्या प्रस्तावा विरूध्द सावधगिरी व्यक्त केली आहे असे म्हटले आहे की, ही संकल्पना अस्पष्ट आहे. ती अंमलात आणण्यास निवडणूका अन्यायकार होते. विरोधी पक्षांचे मुख्य चिंता ही आहे की, ज्या प्रादेशिक पक्षांकडे त्यांच्या मोठया प्रतिस्पर्धा निघतील संसाधने नाहीत. ते देशाच्या इतर भागातील दुर्गम मतदान केंद्रांवर पोलिंग एजंट तैनात करू शकणार नाहीत. मतदान प्रक्रिया गुप्त आणि निःपक्ष असल्याचे खात्री करून हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी मतदान केंद्रावर त्यांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी उमेदवारांनी नियुक्त केलेले पोलिंग एजन्ट हे कर्मचारी असतात. त्याचप्रमाणे आता वापरल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या सुधारीत आवृत्तीचा वापर करण्याच्या प्रस्तावाने उपकरणांमध्ये फेरफार केल्याबद्दल प्रदीर्घ आरोपांना बळ दिले आहे. देशांतर्गत स्थलांतरितांची व्याख्या करणे, दूरस्थ मतदारांची गणना करणे आणि इतर राज्यांतील दुर्गम मतदान केंद्रांवर आदर्श आचारसंहितेचे अंमलबजावणी करणे ही आव्हाने आहेत. मतदानाची गोपनीयता सुनिश्चित करणे, मतदारांच्या ओळखीसाठी पोलिंग एजंटसची सुविधा करणे आणि दूरस्थ मतदान तसेच मत मोजणीची प्रक्रिया व पध्दत असे इतर मुद्दे आहेत. लोकप्रतिनिधी कायदा १९५० आणि १९५१, निवडणूक नियम १६१ आणि मतदारांची नोंदणी रिमोट व्होटींग लागू करण्यासाठी नियम १९६० मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. कायदे केवळ संसदेद्वारे बदलले जावू शकतात परंतू या प्रकरणात संबंधित नियम कायदा मंत्रालयाच्या स्तरावर बदलले जावू शकतात. स्थापन करावयाच्या बुथची संख्या आणि त्यांची ठिकाणे ही निश्चित करणे आवश्यक आहे. रिमोट मतदानाची पध्दत, मतदानाची पध्दती आणि आर.व्ही.एम. तंत्रज्ञानाची ओळख, रिमोर्ट बुथवर टाकलेल्या मतांची मोजणी आणि ते इतर राज्य किंवा राज्यांमध्ये असलेल्या रिटर्निंग ऑफिसर पर्यंत पोहंचविणे यासाठी देखील विचारविनियम करणे आवश्यक आहे.

संशोधन समस्या

भारतीय निवडणूक आयोगाच्या मते, 'रिमोट' म्हणजे घरचा मतदार संघ, जिल्हा किंवा राज्याबाहेरचा आहे की नाही हे परिभाषित करणे तसेच "घरगुती स्थलांतरित" कोणाला मानले जाऊ शकते यासारखी कायदेशीर आव्हाने आहेत. त्याचप्रमाणे, दूरस्थ मतदान प्रक्रियेबद्दल मतदारांमध्ये अपरिचितता आणि मतदान यंत्रांची सुधारित आवृत्ती यासारखी तांत्रिक आव्हाने आहेत. याव्यतिरिक्त, किती दूरस्थ मतदान केंद्र असतील हे स्पष्ट नाही.

भारताच्या ग्रामीण आणि दूर्गम भागांमध्ये इंटरनेट कनेक्टव्हिटीची कमतरता असल्याने दूरस्थ मतदानाची अंमलबजावणी आव्हानात्मक ठरते. सायबर हल्ले आणि डेटा चोरीचा धोका कायम आहे. सायबर सुरक्षा आणि उपाययोजना प्रभावीपणे लागू करणे महत्वाचे ठरते. अशा तांत्रिक अडचणी संशोधनात अडथळा निर्माण करतात. ग्रामीण आणि आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांमध्ये डिजिटल साक्षरतेचा अभाव असल्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करून मतदान करणे अवघड ठरते. विद्यमान कायदे आणि नियमन दूरस्थ मतदान पध्दतीसाठी उपयुक्त नाहीत. नवीन नियमन विकसित करण्याची गरज आहे, ज्यामुळे कायदेशीर गुंतागुंत वाढू शकते, मतदानाचा डेटा आणि मतदान प्रक्रीयेतील गोपनियता सुरक्षित ठेवणे हे एक मोठे आव्हान आहे. दूरस्थ मतदान प्रणाली मध्ये भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार होण्याची शक्यता असते, ज्यामुळे निवडणूक प्रक्रीया प्रभावी होऊ शकते. निवडणूक आयोगाचे अधिकारी आणि कर्मचारी यांना योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाची कमतरता असल्यास तांत्रिक आणि व्यवस्थापकीय अडचणी वाढू शकतात. मतदानांचा नवीन तंत्रज्ञानावर विश्वास निर्माण करणे हे आव्हान आहे. दूरस्थ मतदान प्रणालीच्या विश्वासर्हतेबद्दल मतदारांमध्ये शंका असू शकते. दूरस्थ मतदान प्रणालीचा अंमलबजावणीसाठी आवश्यक तांत्रिक साधन सामुग्री, सायबर सुरक्षा, उपाययोजना आणि प्रशिक्षण यासाठी मोठा आर्थिक खर्च अपेक्षीत आहेत. भारतातील प्रायोगिक संकल्पनांची संख्या कमी आहे. ज्यामुळे दूरस्थ मतदान पध्दतीचे प्रभावीता आणि अडचणी यांचे निराकरण करणे आवश्यक आहे, त्यामुळे 'दूरस्थ मतदान पध्दती आणि भारताची त्या दिशेने वाटचालः एक चिकित्सक अभ्यास' या विषयावरील शोध घेऊन त्यावर उपाययोजनेच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत शोध निबंधातून अभ्यास करण्यात येणार आहे.

<u>संशोधन उद्दीष्टये</u>

१. मतदान प्रक्रियेत सुधारणा करून समाजात लोकशाही मुल्यांचा प्रचार करणे.

२. मतदारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी किंवा घरातून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करूनदेणे.

३. अपंग, वयोवृध्द आणि स्थलांतरीत लोकांना मतदानाची सुविधा उपलब्ध करून देणे.

४. मतदान प्रक्रियेत तांत्रिक सुधारणा तसेच पारदर्शकता आणि गोपनियता सुनिश्चित करणे.

५. ई-वोटींग, ब्लॉकचेन आणि बायोमेट्रीक प्रमाणीकरण यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानांचा वापर करून मतदान प्रक्रिया अधिक सुलभ बनविणे.

संशोधनाची गृहीतके

१. विद्यमान मतदान पध्दतीतील त्रूटी आणि आव्हानामुळे दूरस्थ मतदान पध्दतीची आवश्यकता निर्माण झाली आहे.

२. दूरस्थ मतदान पध्दतीचे तांत्रिक उपाय (जसे की, ई-वोटींग, ब्लॉकचेन) तांत्रिक उपाय अधिक सुरक्षित आणि गोपनिय मतदान प्रक्रियेची हमी देतात.

३. दूरस्थ मतदान पध्दतीचा अवलंब केल्याने ग्रामीण आणि दुर्गम भागातील मतदारांचा सहभाग वाढेल.

४. दूरस्थ मतदान पध्दतीमुळे निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढेल.

५. भारताच्या निवडणूक व्यवस्थापणात दूरस्थ मतदान पध्दतीच्या अंमलबजावणीसाठी पुरेशी तांत्रिक आणि व्यवस्थापकिय क्षमता वाढेल.

संशोधनाचे महत्व

प्रवासी मतदार देशाच्या विविध भागातून कामासाठी स्थलांरीत झालेले नागरीक निवडणूक प्रक्रीयेत सहभागी होऊ शकत नाहीत. दूरस्थ मतदान पध्दतीने त्यांना सोयीस्कर पध्दतीने मतदानाची संधी मिळते. शिक्षणासाठी इतर राज्यात राहणारे विद्यार्थी त्यांच्या मुळ ठिकाणच्या मतदानप्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. अपंग, वयोवृध्द आणि आजारी व्यक्तिंसाठी मतदान केंद्रावर जाणे कठीण असते. दूरस्थ मतदान पध्दतीने त्यांना घरबसल्या मतदान करण्याची सुविधा मिळते. काही ग्रामीण आणि दुर्गम भागात मतदान केंद्रापर्यंत पोहंचणे अवघड असते. दूरस्थ मतदान पध्दतीने या भागातील मतदारांना सहज मतदानाची संधी मिळते. कोविड-१९ सारख्या महामारीत किंवा नैसर्गिक अपत्तीमध्ये मतदान केंद्रावर जाणे सुरक्षित नसते. अशा परिस्थितीत दूरस्थ मतदान पध्दतीने सुरक्षित पर्याय ठरू शकतो. काही कामगारांसाठी निवडणूकीच्या दिवशी मतदान केंद्रावर जाणे शक्य नसते. दूरस्थ मतदान पध्दतीने त्यांच्या मतांचा समावेश होऊ शकतो. या पध्दतीने अधिकाधिक लोकांना मतदानाची संधी मिळते, ज्यामुळे लोकशाही प्रक्रिया सशक्त होते. विविध समाज घटकांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढतो ज्यामुळे सरकार अधिक प्रतिनिधीक्षम बनते.

तांत्रिक उपायांनी मतदान प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि गोपनिय बनविता येते, ज्यामुळे मतदारांचा विश्वास वाढतो. प्रत्यक्ष मतदान केंद्रावर लागणाऱ्या खर्चात बचत होते, तांत्रिक उपायाने वेळ आणि खर्च दोन्ही कमी होतात. डिजिटल आणि तांत्रिक उपायाने मतदान प्रक्रियेत पारदर्शकता येते, ज्यामुळे निवडणूक

प्रक्रियेतील विश्वासार्हता वाढते. मतदारांना घरबसल्या किंवा त्यांच्या सोयीनुसार मतदान करता येते. ज्यामुळे मतदान प्रक्रिया सोपी आणि सुलभ होते. ब्लॉकचेन, बायोमेट्रीक प्रमाणीकरण आणि सायबर सुरक्षा यासारख्या उपायांनी मतदान प्रक्रिया आधुनिक बनते. या पध्दतीच्या अंमलबजावणीमुळे मतदान प्रक्रियेत समावेशकता, सुरक्षा वाढते. त्यामुळे अधिकाधिक लोकांना त्यांच्या मतदान हक्काचा उपयोग करण्याची संधी मिळते. ज्यामुळे लोकशाही प्रक्रिया अधिक सक्षम होते.

संशोधनाच्या पध्दती

१. प्राथमिक डेटा संकलन

सर्वेक्षण

मतदान प्रक्रियेतील मतदारांच्या अनुभवाबद्दल माहीती मिळविण्यासाठी प्रश्नावली तयार करणे, शहरी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील मतदारांचे मत जाणून घेणे, अपंग, वयोवृध्द आणि स्थलांरीत लोकांच्या अनुभवांचे विश्लेषण करणे.

मुलाखती

निवडणूक अधिकारी, तांत्रिक तज्ज्ञ आणि निवडणूक प्रक्रियेतील इतर संबंधित व्यक्तींचे सखोल मुलाखती घेणे. मतदारांच्या अनुभवाबद्दल अधिक माहिती मिळविणे.

फोकस ग्रुप चर्चा करणे.

विविध समाज घटकांमधील मतदारांसोबत चर्चा करणे.

मतदारांच्या समस्यांबद्दल आणि अपेक्षांबद्दल माहीती मिळविणे.

२. दुय्यम डेटा संकलन

साहित्य समिक्षा

जागतिक आणि राजकिय स्तरावरील दूरस्थ मतदान प्रक्रियेवर आधीचे संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या अहवालांचे अध्ययन करणे. ई-वोटींग, ब्लॉकचेन, तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षा विषयक साहित्याचा अभ्यास करणे.

सरकारी अहवाल आणि डेटा यांचा अभ्यास करणे.

निवडणूक आयोगाचे अहवाल, डेटा आणि निवडणूक प्रक्रियेवरील अधिकाधिक माहितीचे विश्लेषण करणे.

दूरस्थ मतदान पध्दतमधील सरकारी धोरणे आणि नियमांचे अध्ययन करणे.

प्रकाशित संशोधन आणि लेख यांचे अध्ययन करणे.

विद्यमान शैक्षणिक आणि तांत्रिक लेख, संशोधन पेपर आणि तज्ज्ञांचे विश्लेषण अभ्यासणे.

३. तांत्रिक विश्लेषण

तांत्रिक पध्दतीचे मुल्यांकन करणे.

४. केस स्टडीज

प्रायोगिक प्रकल्प

भारतातील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील दूरस्थ मतदान पध्दतीच्या प्रायोगिक प्रकल्पांचे विश्लेषण आणि प्रायोगिक प्रकल्पांच्या यशस्विता आणि अडचणींचे मुल्यांकन करणे.

विविध देशांचे उदाहरणे

इतर देशांमध्ये अंमलात आणलेल्या दूरस्थ मतदान पध्दतीचे अध्ययन. त्यांच्या यशस्विता आणि समस्या तसेच भारतीय परिप्रेक्ष्यात त्यांची उपयुक्तता अभ्यासणे.

५. सांख्यिकी विश्लेषण

डेटा विश्लेषण संकलित डेटा सांख्यिकी पध्दतीने विश्लेषित करणे.

मतदारांच्या सहभाग, तांत्रिक अडचणी, मतदान प्रक्रियेतील पाररदर्शकतेचे विश्लेषण करणे.

आर्थिक विश्लेषण

दूरस्थ मतदान पध्दतीच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या खर्चाचे विश्लेषण, दिर्घकालीन आर्थिक फायदे आणि खर्चाची तुलना करणे.

संशोधन आराखडयाचे महत्व

संशोधनाचा उद्देश्य, समस्या विधान आणि उद्दीष्टे स्पष्टपणे मांडणे. यामुळे संशोधनाच्या दिशा दर्शविण्यासाठी आणि संशोधन प्रक्रिया सोप्या आणि परिणामारक होण्यासाठी मदत होते. संशोधन आराखड्यामुळे संशोधनाचे विविध टप्पे जसे की, (साहित्य समिक्षा, डेटा संकलन, विश्लेषण, निष्कर्ष) नियोजित पध्दतीने पार पाडता येतात. विषयावर आधी केलेल्या संशोधनाची माहिती मिळवून त्या मधील अंतर शोधून काढणे, यामुळे आपल्या संशोधनाला एक ठोस आधार मिळतो. कोणत्या पध्दतीने डेटा संकलन करावयाचा, कोणत्या तंत्रांचा वापर करायचा, कोणत्या साधनांचा वापर करायचा हे ठरविता येते. यामुळे संशोधनाची दिशा ठरविणे आणि योग्य साधनसामुग्रीचे निवड करणे सोपे होते. संशोधन प्रक्रियेत विविधता आणि विश्वासनिर्हता ठेवणे आवश्यक आहे. संशोधन आराखडयामुळे हे दोन्ही साध्य करण्यास मदत होते. संशोधनाचा विविध टप्यावर येणाऱ्या समस्यांचा विचार करून त्यांचे निराकरण कसे करायचे हे ठरविणे सोपे होईल.

संशोधन प्रक्रिया आणि नैतिकतेच्या दृष्टीने नियमांचे पालन सुनिश्चित करणे, सुशोधनाच्या शेवटी कोणतेही निष्कर्ष काढता येते ह पुर्वानुमान करणे. यामुळे संशोधनाचे परिणाम अधिक प्रभावीपणे मांडता येतात. संशोधन आराखडा हा एक प्रकारे संशोधनाच्या प्रक्रियेचा मार्गदर्शक असतो जो संशोधनाला व्यवस्थित आणि नियोजीत पध्दतीने पुढे नेण्यासाठी मदत करतो.

संकलित प्रबंधाची प्रकरणे

प्रकरण पहीले : भारतातील विद्यमान मतदान पध्दतीचा आढावा.

भारतातील निवडणूक विषय कायदे आणि सुधारणा यांचा संशोधन पर आढावा घेणे तसेच विद्यमान पध्दतीतील त्रूटी अभ्यासणे.

प्रकरण दुसरे : जागतीक स्वरावरील दूरस्थ मतदान पध्दती

जागतीक स्तरावर काही देशांनी रिमोट इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली स्विकारल्या आहेत. त्या-त्या देशाच्या यश आणि आव्हाने भिन्न आहेत. काही प्रमुख उदाहरणे असे आहेत की, एस्टोनिया या देशा मध्ये २००५ पासून इंटरनेट मतदान प्रणाली यशस्वीरित्या वापरली जात आहे. मतदान इंटरनेटद्वारे मतदान करू शकतात, ज्यामुळे मतदान प्रक्रियेत सुलभता आणि पारदर्शकता वाढली आहे. स्विर्त्झर्लंडमध्ये देखील इंटरनेट मतदानाचे प्रयोग झाले आहे. तिथे काही निवडणूकांमध्ये नागरीकांनी ऑनलाईन पध्दतीने मतदान केले आहे. ऑस्ट्रेलियामध्ये विशेषतः दूरवरच्या किंवा अक्षम मतदारांसाठी काही निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली वापरली जाते. फ्रान्समध्ये विदेशात असलेल्या नागरीकांसाठी इंटरनेट मतदानाचा प्रयोग केला गेला आहे. भारतातील दूरस्थ मतदान पध्दती संबंधी संशोधनांचे परिक्षण करणे आणि आव्हानांचा अभ्यास करणे.

प्रकरण तिसरे : दूरस्थ मतदान पध्दतीची गरज आणि महत्व

ग्रामीण व शहरी भागातील मतदारांचे अनुभव आणि अपेक्षा, महामारी आणि आपत्ती काळात दूरस्थ मतदानाची गरज लक्षात येता त्या दृष्टीकोनातून प्रस्तुत विचार करणे.

प्रकरण चौथे : ई-वोटींग तंत्रज्ञान आणि त्याची अंमलबजावणी

१. ई-वोटींगचे विविध प्रकार आहेत, त्यांचे वर्गीकरण विविध निकषांवर आधारीत केले जाते.

- पारंपारीक ई-वोटींग
  किऑस्क वोटींग

२. रिमोट वोटींग

- ऑनलाईन वोटींग
  मोबाईल वोटींग

३.   डिस्ट्रीब्युटेड ई-वोटींग

-        ब्लॉकचेन वोटींग

४.   हायब्रिड ई-वोटींग

५.   दूरस्थ मतदान

-        डायस्पोरा वोटींग

प्रकरण पाचवे - निवडणूक आयोगाचे नियमन आणि धोरणे

भारतीय निवडणूक आयोगाची निवडणूक प्रक्रिया आणि त्यांचे नियमन करणे हे मुख्य कार्य आहे. वोटर रजिस्ट्रेशनद्वारे निवडणूक आयोग निवडणूकपुर्वी मतदार यादी तयार करतो व त्यामध्ये नव्या मतदारांची नोंदणी केली जाते. उमेदवार व पक्ष आपल्या प्रचाराची मोहीम चालवितात. ज्यामध्ये विविध माध्यमांचा वापर होतो. मतदान केंद्रावर मतदान इलेक्ट्रॉनिक वोटींग मशिनच्या माध्यमातून आपला मतदानाचा हक्क बजावतत. मतदानानंतर मत मोजणी होते व निकाल जाहीर केले जातात. मतदान नोंदणी प्रक्रिया आणि प्रशिक्षण देणे तसेच जागरूकता कार्यक्रम आणि प्रचार करणे व्यवस्थापन आणि अंमलबजावणी करणे.

संक्षेप सूची

AC	Assembly Constituency	विधानसभा मतदारसंघ
AIS	Addistional Information Sheet	अतिरिक्त माहिती प्रपत्र
AERO	Assistant Electorial Registration Officer	सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी
ASD	Absentee Shifted and Dead	अनुपस्थित स्थलांतरीत व मयत
BEL	Bharat Electronics Limited	भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड
BLO	Booth Level Officer	मतदान केंद्रास्तरीय अधिकारी
BU	Bullot Unit	मतदान युनिट
ECI	Election Commission Of India	भारत निवडणूक आयोग
ERO	Electroral Registration Officer	मतदार नोंदणी अधिकारी
CAPF	Central Armed Police Force	केंद्रीय सशस्त्र पोलीस दल
CSV	Classified Service Voter	वर्गीकृत सेवा मतदार
CU	Control Unit	नियंत्रण युनिट
DEO	District Election Officer	जिल्हा निवडणूक अधिकारी
ECIL	Electronic Corporation Of India Limited	इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
EPIC	Electrtro's Photo Idenitity	मतदार छायाचित्र ओळखपत्र
EVM	Electronic Voting Machine	इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र
MO	Micro Observer	सुक्ष्म निरीक्षक
NOTA	None of the Above	वरीलपैकी कोणीही नाही
PC	Parliamentary Constiuency	लोकसभा मतदारसंघ
PER	Photo Electoral Roll	छायाचित्र मतदार यादी
PO1	First Polling Officer	पहिला मतदान अधिकारी
PO2	Second Polling Officer	दुसरा मतदान अधिकारी
PO3	Third Polling Officer	तिसरा मतदान अधिकारी
PPS	Pink Paper Seal	गुलाबी कागदी मोहोर
PrO	Presiding Officer	मतदान केंद्र अध्यक्ष
PS	Polling Station	मतदान केंद्र
PV	Proxy Voter	बदली मतदार
RO	Returning Officer	निवडणूक निर्णय अधिकारी
SO	Sector Officer	क्षेत्र अधिकारी
VAB	Voter Assistant Booth	मतदान सहाय्यता केंद्र
VIP List	Very Important Persons List	अती महत्वाच्या व्यक्तिंची यादी
VIS	Voter Information Slip	मतदार माहिती चिठ्ठी
VVPAT	Voter Verfiable Paper Audit Trail	मतदान पडताळणी योग्य कागदे परिनिरीक्षण निशाणी स्थितीदर्शक युनिट

संदर्भ साहित्य

१. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, जून २००३, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. ४०२, ४०३, ४०५

२. तुकाराम जाधव अणि महेश शिरापूरकर, २०२२, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रकिया, युनिक अकॅडमी पब्लिकेशन, पुणे, पृष्ठ क्र. ५४४, ५४५, ५४६, ५४७

३. प्रकाश पवार, मार्च २००९, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना (मतदान संघाची पुनर्रचना), प्रतिमा प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र. २०, २१

४. राही श्रुती गणेश आणि श्रीरंजन आवटे, १ सप्टेंबर २०२३, आपलं आयकार्ड, युनिक ॲकॅडमी, पुणे, पृष्ठ क्र. ६७, ६९

५. भारतीय निवडणूक आयोगाचा दूरस्थ मतदान पध्दतीवरील अहवाल ऑफिसिअल वेबसाईट

https://eci.gov.in

६. अमेरिकन सरकारचा दूरस्थ मतदान पध्दतीच्या आव्हानांवर आणि संधीवर आधारित अहवाल.

७. ई.वी.एम. इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन की सच्ची कहानी, प्रभात प्रकाशन, वर्ष २०१९, नवी दिल्ली पृष्ठ क्र. १०६, १०७, १०८, १०९.

८. ऑफिसिअल वेबवाईट https://mahasec.maharashtra.gov.in

९. माधव गोडबोले, अनुवाद सुजाता गोडबोले वर्ष २०१४, राजहंस प्रकाशन पुणे,भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा पृष्ठ क्र. १८५, १८६, १८७.

१०. भारतातील स्थलांतरीत लोकसंख्या अहवाल, भारतीय जनगणना २०११.

११. भारतातील निवडणूक आयोगाचा दूरस्थ मतदान पध्दतीवरील अहवाल

१२. युरोपीयन कमिशनचा ई. वोटींग प्रणालीचे मुल्यांकन करणारा अहवाल.

१३. अमेरीकन सरकारचा दूरस्थ मतदान पध्दतीच्या अहवालावर आणि संधीवर आधारीत अहवाल

१४. ई-वोटींग प्रणालीच्या सुरक्षेचे विश्लेषण आणि तांत्रिक उपाययोजना

१५. दुरस्थ मतदान पध्दतीचा लोकशाहीवर होणारा प्रभाव आणि त्यांची अंमलबजावणी

१६. भारताचे संविधान : भारत सरकार (न्याय व विधी मंत्रालय) २००६

१७. भारतीय निवडणूक प्रणाली स्थित्यंतर व आव्हाने : डॉ. तुषार निवृत्ती निकाळजे, हरिती पब्लिकेशन पृष्ठ क्र. ९७, १०९, १६६, १६७.

१८. दूरस्थ मतदान पध्दतीवर आधारीत लोकसत्ता लेख (विश्लेषण) : रविंद्र माने ४ जानेवारी २०२३.

१९. मतदान केंद्र अध्यक्षांसाठी निदेशपुस्तक २०२३ भारतीय निवडणूक आयोग https://eci.gov.in

संशोधक
वाघमारे संध्याताई मारोतीराव

मार्गदर्शक
प्रा. डॉ.माधव माणिकराव चोले